जा.क.मसके/रूखी/ठेका/ 15 /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक : 13.01.2023

प्रती,

मा.व्यवस्थापक,
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली

**विषय** :रूखी विभागाअंतर्गत काजू बागेतील साफसफाई करणेसाठी ठेका पध्दतीने कामे करण्यास जाहिरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत...........

महाशय

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की या केंद्रास रूखी विभागाकरीता काजू बागेतील साफसफाई करणेसाठी ठेका पध्दतीने कामे करण्यास त्याबाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) करणेस विनंती आहे. सोबत प्रसिध्दी नमुना जोडणेत येत आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

आपला विश्वासू,

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली जि.रत्नागिरी

जा क्र मसके/प्रअरू/ठेका/15/ /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक ः 13.01.2023

# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत रूखी येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत.

| कामाचा तपशिल (कालावधी ०१.०२.२०२३ ते २८.०२.२०२३) |
| --- |
| **क्षेत्र १८.१३ हे. झाडांची संख्या २३८६** |
| १.काजू लागवडीतील झाडांच्या बुंध्याजवळची आणि झाडाच्या विस्ताराखालील ग्लिरीसीडीया गवत,दिंडा, कुडा, लाजरी, करवंद सारखी सर्व काटेरी झुडपे, जमिनी लगत तोडून, तोडलेला कुजण्यायोग्य पाला पाचोळा गोळा करने, गोळा केलेला कुजण्यायोग्य पालापाचोळा सरळ ओळींमध्ये चेपून बेड तयार करणे. |
| २.मेलेली काजू झाडे बुंध्यासकट काढून गट रचणे |
| ३.जळाऊ लाकूड तोडून, गोळा करून त्याचे ब्रास सारखे चौकोनी गट रचून ठेवणे. |
| ४.काजू बागेतील सुकलेल्या फादया तोडुन गट रचुन बोर्डोपेस्ट लावणे. |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत.कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.कंत्राटी कामाचे दरपत्रक भरून दयावयाचे आहे.दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक २५.०१.२०२३ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे.विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.लखोटयावर **"रूखी विभागाअंतर्गत गट कं.0३ मधील काजु बागेची साफसफाई करणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (रूखी विभाग) यांचे नावे पाठवावा.पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील.सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.

प्रत माहिती व पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी सादर...
१.नोटीस बोर्ड, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
२.ग्रामपंचायत कार्यालय ः रूखी, गावतळे, असोंड, टेटवली